# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 13 SEP 2025
टिपणी क्रमांक व्हीसी 4003
जावक दिनांक 13 SEP 2025

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## सोमवार, दि. १० मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये झालेले निर्णय.

| विषय | निर्णय |
|---|---|
| ०१ प्रव-अ-२७/१००३२५<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २३.०१.२०२५, रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | म : २९/१००३२५<br>इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| ०२ प्रव-अ-२८/१००३२५<br>मा.व्यवस्थापन परिषदेच्या दि. २६.१२.२०२४ रोजीच्या सभेमधील निर्णयांवरील कार्यवाहीबाबत. | म : ३०/१००३२५<br>विद्यापीठ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे. |
| ०३ प्रव-अ-२९/१००३२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९४ (६) (क) नुसार तयार केलेला आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अर्थसंकल्प मसुदा विचारार्थ व मान्यतेसाठी सादर. | म : ३१/१००३२५<br>आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अर्थसंकल्प मसुदा योग्य त्या दुरुस्त्या व शिफारशीसह व आर्थिक वर्ष २०२४-२५ चा सुधारित अंदाज मंजूर करण्याची शिफारस मार्च, २०२५ मध्ये होणाऱ्या अधिसभेस करण्यात येत आहे.<br>आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अर्थसंकल्प मसुदा व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. रविंद्र शिंगणापूरकर यांनी अधिसभेस सादर करावा. |
| ०४ प्रव-अ-३०/१००३२५<br>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा विद्यार्थी विकास मंडळाचा वार्षिक अहवालाचा मसुदा विचारार्थ. | म : ३२/१००३२५<br>विद्यार्थी विकास मंडळाचा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक अहवालाचा मसुदा योग्य त्या दुरुस्त्या व शिफारशीसह मंजूर करण्याची शिफारस मार्च, २०२५ मध्ये होणाऱ्या अधिसभेस करण्यात येत आहे.<br>व्यवस्थापन परिषद सदस्य श्रीमती बागेश्री मिलिंद मंठाळकर यांनी सदर अहवाल अधिसभेस सादर करावा. |
| ०५ प्रव-अ-३१/१००३२५<br>मा. अधिष्ठाता मंडळाने तयार केलेला शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा विद्यापीठाचा वार्षिक अहवालाचा मसुदा विचारार्थ. | म : ३३/१००३२५<br>२०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या वार्षिक अहवालाचा मसुदा योग्य त्या दुरुस्त्या व शिफारशीसह मंजूर करण्याची शिफारस मार्च, २०२५ मध्ये होणाऱ्या अधिसभेस करण्यात येत आहे.<br>व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य (डॉ.) देविदास भीमराव वायदंडे यांनी सदर वार्षिक अहवाल अधिसभेस सादर करावा. |
| ०६ प्रव-अ-३२/१००३२५<br>एच. व्हि. देसाई महाविद्यालय, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ या महाविद्यालयाच्या नावात बदल करणेबाबत. | म : ३४/१००३२५<br>दी पूना गुजराती केळवाणी मंडळ, पुणे या संस्थेने त्यांच्या दिनांक २७/०९/२०२४ रोजीच्या सभेत पारित केलेल्या ठरावानुसार त्यांचे संस्थेच्या एच.व्ही. देसाई महाविद्यालय, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ या महाविद्यालयाच्या नावात खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे बदल |

| | |
|---|---|
| | करण्यास मान्यता देणेबाबत महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>मराठीमध्ये नावः- हरिभाई व्ही. देसाई कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देसाई ब्रदर्स, विद्या भवन, ५९६, बुधवार पेठ पुणे - ४११००२.<br>इंग्रजी नाव :- **Haribhai V. Desai College of Arts, Science & Commerce, Desai Brother's Vidya Bhavan, Budhwar Peth, Pune - 411002.**<br>अटी व शर्ती :-<br>१. उपरोक्त महाविद्यालयाच्या नावातील बदल हा फक्त त्या बाबी पुरताच मर्यादित असून अशा बदलामुळे त्या महाविद्यालयास यापूर्वी प्राप्त मूळ शासन मान्यतेत बदल होणार नाही.<br>२. अशा नाव बदलामुळे शासनावर कोणतेही अतिरिक्त दायित्व निर्माण होणार नाही. |
| ०७ प्रव-अ-३३/१००३२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जिमखाना विभागाचे कामकाज क्रीडा व शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाकडे वर्ग करणेबाबत. | म : ३५/१००३२५<br>सदरील प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेत पुनःश्च सादर करण्यात यावा. |
| ०८ प्रव-अ-३४/१००३२५<br>मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेच्या अभ्यासकेंद्रांना द्यावयाच्या मानधनाबाबत. | म : ३६/१००३२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेच्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्लिश, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान व शिक्षणशास्त्र), एम.कॉम. व एम.बी.ए. या शिक्षणक्रमांकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अभ्यास केंद्रांना दोन टप्प्यात मानधन अदा करण्यास व त्यापैकी प्रथम व तृतीय वर्ष प्रवेशापोटी प्रथम टप्प्यात प्रति विद्यार्थी रु. ६००/- प्रमाणे रु. २२,८७,२००/- इतके मानधन प्रशाळेच्या 'स्टडी सेंटर' या अर्थशिर्षामधून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये अदा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |
| ०९ प्रव-अ-३५/१००३२५<br>मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमधील विद्यार्थ्यांना द्यावयाचे स्वयं-अध्ययन साहित्य (Self Learning Material) विकसित व मुद्रित करून घेणे. | म : ३७/१००३२५<br>मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता आवश्यक असलेले स्वयं-अध्ययन साहित्य मे. विकास पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, यांचेकडून विकसित व मुद्रित करून घेण्यास आणि त्यासाठी येणारा अंदाजे अपेक्षित खर्च रु. ५४,४२,२३८/- व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास, सदर खर्च प्रशाळेच्या 'स्वयं-अभ्यास साहित्य' या अर्थशिर्षातून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| १० प्रव-अ-३६/१००३२५<br>इरावती कर्वे सामाजिक संकुलातील सभागृहाचे वापरासंबंधी सर्वंकष धोरण ठरविणेबाबत गठित केलेल्या समितीने तयार केलेल्या नियमावलीच्या मसुद्यास मान्यता मिळणेबाबत. | म : ३८/१००३२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारातील इरावती कर्वे सामाजिक संकुलातील सभागृहाचे वापरासंबंधी सर्वंकष धोरण ठरविणेबाबत गठित केलेल्या समितीने शिफारशींसह तयार केलेल्या नियमावलीच्या मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ११ प्रव-अ-३७/१००३२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची | म : ३९/१००३२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांच्यावर लादावयाची |

| | |
|---|---|
| शास्ती) एकरूप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. २(९) व (१०) मध्ये नमूद शर्तीचा भंग केला असल्याने, सदर एकरूप परिनियमानुसार डॉ. डी. वाय पाटील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट मु. पो. आंबी, तळेगाव दाभाडे, पुणे - ४१०५०६ या महाविद्यालयावर शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत. | शास्ती) एकरुप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. ४(३) अन्वये डॉ. डी. वाय पाटील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट मु.पो. आंबी, तळेगाव दाभाडे, पुणे - ४१०५०६ विरुध्द प्रवीण ज्ञानेश्वर गायकवाड यांचे उक्त प्रकरण (प्रकरण ६५/२०२२) व प्रा. गुणवंत देवमान रहाणे (प्रकरण ६६/२०२२) प्रकरणाची चौकशी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>अ.क्र. सदस्याचे नाव<br>१. डॉ. राजेंद्र एकनाथराव विखेपाटील<br>२. श्रीमती. (डॉ.) ज्योत्स्ना गजानन एकबोटे<br>३. श्रीमती. (डॉ.) संगीता विजय जगताप<br>४. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग संलग्नता कक्ष (सदस्य सचिव) |
| १२ प्रव-अ-३८/१००३२५<br>मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. ८८१८/२०२१ व याचिका क्र. ८५९०/२०२१ श्रीमती स्मिता अविनाश कुंभार विरूध्द चौधरी अतरसिंग यादव मेमोरीयल एज्युकेशन ट्रस्ट, मोरवाडी, पिंपरी, पुणे ४११ ०१८, मा. उच्च न्यायालयाने प्रस्तुत याचिकेमध्ये दि. ०५/०३/२०२४ रोजीच्या आदेशानुसार चौधरी अतरसिंग यादव मेमोरीयल एज्युकेशन ट्रस्ट, मोरवाडी, पिंपरी, पुणे ४११ ०१८ या महाविद्यालयावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करणेबाबत. | म : ४०/१००३२५<br>चौधरी अत्तारसिंग यादव मेमोरीयल एज्युकेशन ट्रस्ट मोरवाडी, पिंपरी या संस्थेच्या सिध्दांत इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे या संस्था/महाविद्यालयावर एकरूप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क. ४(५) नुसार सदर परिनियमातील खंड ३ मधील मुद्दा क्र. २ अन्वये रक्कम रु. १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) इतकी शास्ती लादण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>या परिनियमातील शास्ती लादणे याचा कोणत्याही प्रसंगी कसूरदार महाविद्यालयाने/मान्यताप्राप्त परिसंस्थेने किंवा, यथास्थिती, त्यांच्या व्यवस्थापनाने केलेली अनियमितता नियमित झाली आहे किंवा माफ करण्यात आली आहे, असा अर्थ ध्वनित होत नाही असे संबंधित महाविद्यालय व महाविद्यालयाच्या व्यवस्थापनेस कळविण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| १३ प्रव-अ-३९/१००३२५<br>साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे बी.एड. कॉलेज, पत्ताः गुरूकुल बिल्डिंगमागे, अहिल्यानगर, ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर - ४१४ ००१ या महाविद्यालयाच्या स्थानांतरणाबाबत आणि महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबत गठीत केलेल्या समितीच्या अहवालाबाबत. | म : ४१/१००३२५<br>राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद (एनसीटीई), पश्चिम क्षेत्रीय समिती, नवी दिल्ली यांचे पत्र अनुक्रमे संदर्भ क्र. **NCTE/WRC/APW03989/123473/B.Ed./391st/M.H./2023/223823**, दिनांक ०७/०८/२०२३ **(Order For Change in the Name of the Institution)** व संदर्भ क्र. **NCTE/WRC/APW03989/123473/B.Ed./396th/M.H./2023/224385 to 224391**, दिनांक ०९/१०/२०२३ **(Order For Shifting of Premises)** अन्वये साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे बी.एड. कॉलेज, पत्ताः गुरूकुल बिल्डिंगमागे, अहिल्यानगर, ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर - ४१४००१ या महाविद्यालयाच्या स्थानातरणास आणि महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबत दिलेल्या मान्यतेस अनुसरून साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अडसूळ बी.एड. कॉलेज असे महाविद्यालयाचे नवीन सुधारीत नाव तसेच संबंधित महाविद्यालय हे गुरूकुल बिल्डिंगमागे, अहिल्यानगर, ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर - ४१४००१ या ठिकाणाहून महाविद्यालय स्थानांतरीत करावयाचे प्रस्तावित नवीन ठिकाण/पत्ता गेट नं. ६४+६५+७५पी+१०८४पी, चास - निंबळक बायपास रोड, चास, ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर - ४१४००९ या ठिकाणी स्थानांतरित |

| | |
|---|---|
| | करण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| १४ प्रव-अ-४०/१००३२५<br>मायक्रोसॉफ्ट कंपनीसोबत नवीन कॅम्पस करार करण्याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | म : ४२/१००३२५<br>मायक्रोसॉफ्ट कंपनीसोबत पुढील तीन वर्षांसाठी (फेब्रुवारी २०२५ ते जानेवारी २०२६, फेब्रुवारी २०२६ ते जानेवारी २०२७ व फेब्रुवारी २०२७ ते जानेवारी २०२८) कॅम्पस करार करण्यासाठी प्रतिवर्षी येणाऱ्या अंदाजे रु. ७०,००,०००/- (रुपये सत्तर लाख सर्व खर्चासहित) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी तसेच सदरचा करार मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या अधिकृत वितरकामार्फत करण्यास व टेंडर करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. |
| १५ प्रव-अ-४१/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दि. १७ जानेवारी, २०२५ रोजी सभेमध्ये झालेल्या ठरावानुसार मानवविज्ञान विद्याशाखांच्या पदविका व पदव्युत्तर पदविकेच्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल व पायाभूत अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करण्यास मान्यता देणेबाबत. | म : ४३/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ब १५पीए/१५/२०२५, क्र. ब १४पीए/१४/२०२५, क्र. ब १६पीए/१६/२०२५, क्र. ब १७पीए/१७/२०२५ व क्र. ब १८पीए/१८/२०२५ नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारशींस मान्यता देण्यात येत आहे. |
| १६ प्रव-अ-४२/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दि. १७ जानेवारी, २०२५ रोजीच्या सभेमध्ये झालेल्या ठरावानुसार आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत पदवी अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करण्यास मान्यता देण्याबाबत. | म : ४४/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ब ०२पीए/०२/२०२५ नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारशींस मान्यता देण्यात येत आहे. |
| १७ प्रव-अ-४३/१००३२५<br>विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B. Voc. तदर्थ अभ्यासमंडळांतर्गत a) B. Voc. (Automotive Mechatronics), b) B. Voc. (Rubber Technology), c) B. Voc. (Foundry Technology) या तीनही नवीन पदवी प्रस्थापित करण्यास व अभ्यासक्रमास मान्यता देणेबाबत. | म : ४५/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ब २४पीए/२४/२०२५ नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारशींस मान्यता देण्यात येत आहे. |
| १८ प्रव-अ-४४/१००३२५<br>विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत Bachelor of Design (Interior Design) प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमास व तीन वर्षाच्या आराखडयास मान्यता देण्यास तसेच पदवी प्रस्थापित करणेबाबत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून मान्यता देणेबाबत. | म : ४६/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ब २४पीए/२४/२०२५ नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारशींस मान्यता देण्यात येत आहे. |
| १९ प्रव-अ-४५/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दि. १७ जानेवारी, २०२५ रोजीच्या सभेमध्ये झालेल्या ठरावानुसार वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून खालील स्वायत्त महाविद्यालयांतील अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करण्यास व अभ्यासक्रमास मान्यतेबाबत. | म : ४७/१००३२५<br>मा. विद्यापरिषदेच्या दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ब १३पीए/१३/२०२५ नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारशींस मान्यता देण्यात येत आहे. |
| २० प्रव-अ-४६/१००३२५<br>दिव्यांग विद्यार्थ्यांना शुल्क सवलत देण्याबाबत. | म : ४८/१००३२५<br>मुक्त व दुरस्थ अध्ययन प्रशाळा मधील प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करून त्याची प्रतिपूर्ती विद्यापीठ स्वनिधीतून करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |
| २१ प्रव-अ-४७/१००३२५<br>वसतिगृह कार्यालयाकरिता वसतिगृह सुरक्षेसाठी सहायक वसतिगृहप्रमुख (Assistant Rector) या पदाचे काम करण्याकरिता महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत | म : ४९/१००३२५<br>वसतिगृह कार्यालयाकरिता वसतिगृह सुरक्षेसाठी सहायक वसतिगृहप्रमुख (Assistant Rector) या पदाचे काम करण्याकरिता महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत |

| | |
|---|---|
| (मेस्को) सुरक्षा पर्यवेक्षक दर्जाचे २० मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याबाबत. | (मेस्को) सुरक्षा पर्यवेक्षक दर्जाचे २० मनुष्यबळ आवश्यकतेनुसार वसतिगृह कार्यालयाच्या लेखाशिर्षातून उपलब्ध करुन घेण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.<br>महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत (मेस्को) घेण्यात येणाया मनुष्यबळाच्या कामकाजाबाबतची कार्यपद्धती (S.O.P.), कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करणे, वेतन दर निश्चिती, सेवा शुल्क निश्चिती इत्यादी बाबींची कार्यवाही वसतिगृह कार्यालयामार्फत मा.संचालक सुरक्षा, सुरक्षा विभाग यांनी जावक संदर्भ क्र.४५, दिनांक १३.०२.२०२५ अन्वये सादर केलेल्या प्र-पत्राप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| २२ प्रव-अ-४८/१००३२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सौरउर्जा प्रकल्प उभारणीबाबत. | म : ५०/१००३२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील ३० विभागांच्या इमारतींच्या छतावर एकूण २०२३.४५ (KWp) क्षमतेचे सौरउर्जेचे पॅनेल बसविण्यात आलेले असल्यामुळे सदर प्रस्तावाची नोंद घेण्यात येत आहे. |
| २३ प्रव-अ-४९/१००३२५<br>मा. सिनेट सदस्य श्री. दादाभाऊ भिकाजी शिनलकर यांनी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील परिसरात नवीन वसतिगृह निर्मितीसाठी मांडलेल्या प्रस्तावाबाबत. | म : ५१/१००३२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीकरिता नविन वसतिगृहाच्या इमारतीच्या खोदाई व पायाभरणीचे काम पूर्ण होऊन इमारतीच्या जोत्यापर्यंतचे काम झालेले असल्यामुळे सदर प्रस्तावाची नोंद घेण्यात येत आहे. |
| ०१ प्रव-क-०३/१००३२५<br>वंदे मातरमच्या रचनेची १५० वर्षपूर्ती झाल्याच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजनासाठी समिती घटित करणेबाबत. | म : ५२/१००३२५<br>वंदे मातरमच्या रचनेची १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजनासाठी समिती घटित करणेसाठी मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे. |
| ०२ प्रव-क-०४/१००३२५<br>भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाच्या आयोजनासाठी समिती घटित करणेबाबत. | म : ५३/१००३२५<br>भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाच्या आयोजनासाठी समिती घटित करणेसाठी मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे. |
| ०३ प्रव-क-०५/१००३२५<br>भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त संविधान जागृतीनिमित्त कार्यक्रमाच्या आयोजनासाठी समिती घटित करणेबाबत. | म : ५४/१००३२५<br>भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त संविधान जागृतीनिमित्त कार्यक्रमाच्या आयोजनासाठी समिती घटित करणेसाठी मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे. |

(प्रा (डॉ.) ज्योती भाकरे)
मा. प्रभारी कुलसचिव
सचिव

(प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी)
मा. कुलगुरु
अध्यक्ष